पुण्यनगरी

शुक्रवार, २६ सप्टेंबर २०१४

# पर्यावरणाला समर्पित 'वसुंधरा महोत्सव'

## पर्यावरणविषयक धोरणासाठी वातावरणनिर्मितीचा प्रयत्न

सांगली / प्रतिनिधी

किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवास सांगलीत मंगळवार २३ सप्टेंबरपासून प्रारंभ झाला आहे. हा महोत्सव जगातील युनायटेड किंग्डम, ऑस्ट्रेलिया यानंतर तिसरा सर्वात मोठा महोत्सव असून, पर्यावरण, वन्यजीवन, ऊर्जा, हवा व पाणी या विषयांना समर्पित केलेला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, मध्य प्रदेश, तामिळनाडू अशा पाच राज्यातील शहरांमध्ये हा महोत्सव यावर्षी पार पडत आहे. वसुंधरेच्या सद्यःस्थितीबाबत लोकांना सजग करावं आणि आपला समृद्ध नैसर्गिक ठेवा अधिक समजून घ्यावा, हा या महोत्सवामागचा हेतू आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही या महोत्सवाचे सांगलीत आयोजन करण्यात आले असून, तीन दिवस चालणारा हा महोत्सव येथील रोटरी क्लब परिसर, गणेशनगर येथे भरला आहे. किर्लोस्कर आणि वसुंधरा क्लब यांच्या पुढाकाराने होणारा हा किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव गेल्या ८ वर्षांपासून पुण्यामध्ये आणि ५ वर्षे पुण्याबाहेर आयोजित केला जात आहे. महोत्सवात ५० टक्के चित्रपटांचे प्रदर्शन आणि ५० टक्के इतर उपक्रम असा समतोल साधला आहे. महोत्सवास दरवर्षी पर्यावरणप्रेमींचा वाढता प्रतिसाद मिळत असून, यावर्षी हा महोत्सव सुमारे साडेतीन लाख लोकांपर्यंत पोहोचेल अशी संयोजकांना अपेक्षा आहे. पर्यावरण माझ्या नजरेतून आणि आशेचा किरण या विषयांवरील छायाचित्र प्रदर्शन हा महोत्सवाचा आकर्षणाचा विषय असून वसुंधरा या स्पर्धात्मक प्रदर्शनाकरिता यावर्षी जगभरातून ८ हजार छायाचित्रे दाखल झाली आहेत. त्यातील सर्वोत्कृष्ट २०० छायाचित्रांचा समावेश या प्रदर्शनात करण्यात आला आहे. एक छायाचित्र हजारो शब्दांचे काम कसे करते, ते येथील छायाचित्र प्रदर्शन पाहिल्यावरच कळते. सर्वांच्याचमध्ये पर्यावरणविषयक जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमांची रचना केली आहे.

या वर्षीच्या महोत्सवाचा विषय आरह्म (रिफ्यूज, रिड्यूस, रियूज, रिसायकल, रिकव्हर) हा आहे. या महोत्सवामध्ये दाखवण्यात येत असलेले १५ देशातील ४० लघुपट-अनुबोधपट हे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेले आहेत. चित्रपटांशिवाय छायाचित्र प्रदर्शन, नेचर वॉक, दृक-श्राव्य, व्याख्याने, सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा आदींमुळे हा महोत्सव रंगतदार होणार आहे.

शहरीकरणाचे प्रमाण वाढत आहे. गावांचे छोट्या शहरात, तर शहरे महानगरात रूपांतरित होत आहेत. यामुळे शहराच्या व्यवस्थापनावर ताण पडत असून, जैवविविधतेवर आणि पर्यायाने पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे समाजातील प्रत्येक घटकाने जर पर्यावरण संवर्धनासाठी छोट्या-छोट्या गोष्टी जरी केल्या तरी त्यातून मानसिक समाधान तर मिळेलच, शिवाय पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन होण्यास हातभार लागेल. या दृष्टीने महोत्सवासाठी राबणारे हजारो हात कार्यरत आहेत. वनस्पती, प्राणी आणि सृष्टी यांची काळजी घेवून त्यांच्याबद्दल आदर बाळगा, घराभोवती किमान एक झाड लावून त्याची काळजी घ्यावी, इंधन बचतीसाठी सायकलचा वापर, पाण्याची बचत, नैसर्गिक स्रोतांचा काळजीपूर्वक वापर आदी लहान लहान गोष्टींमधून महोत्सवातून जनजागृती होत आहे.